# गाडी घुंगरांची

चंद्रकुमार नलगे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B151

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**गाडी घुंगरांची : चंद्रकुमार नलगे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १५०/-

# अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गाडी घुंगरांची | ... | ५ - १४ |
| २. | परी | ... | १५ - २५ |
| ३. | निळं आभाळ... लाल ठिपका... | ... | २६ - ३९ |
| ४. | देखणा प्रवास : एका स्वप्नभूमीचा | ... | ४० - ५६ |
| ५. | अखेरचा दिवस | ... | ५७ - ६७ |
| ६. | घर मळ्यातलं... | ... | ६८ - ७३ |
| ७. | चौपदरी संहार | ... | ७४ - ७९ |
| ८. | अंधार | ... | ८० - ८६ |
| ९. | कोण्या राजाचं सिंहासन | ... | ८७ - ९६ |
| १०. | पंख त्यांचे रानपाखरांचे | ... | ९७ - १०६ |
| ११. | सूर्यास्त | ... | १०७ - ११४ |
| १२. | पठ्ठे बापूरावांच्या शोधात | ... | ११५ - १२७ |
| १३. | गोवा : एक अनुभव | ... | १२८ - १३४ |
| १४. | भारतातील सात मोठे नंदिकेश्वर | ... | १३५ - १४१ |
| १५. | अंधार गुहा | ... | १४२ - १५० |
| १६. | जगबुडीची झाडं | ... | १५१ - १६० |

✦ ✦ ✦

# गाडी घुंगरांची

'वैशाख' म्हटलं की, अनेक गोष्टी डोळ्यासमोर उभ्या राहतात. वैशाखातलं रणरणतं ऊन अंगभर जाणवतं. नुसती त्या उन्हाची आठवण झाली तरी गरम वाफारे कानशिलांना चटके देतात. शिशिरात त्या मऊशार कोवळ्या पानांचा स्पर्श तरी किती हळवा वाटतो. लालेलाल झालेले गुलमोहराचं झाड लक्ष नजाकतीची आरास मांडून जाते. गावोगावच्या फुललेल्या चाफ्यांनी सारं वैशाख ऊन डोईवर झेललेले असते.

या वैशाख वणव्यातील गारवा म्हणजे गावोगाव उडालेली 'लगीन घाई'. या लग्नाच्या दिवसांची आठवण झाली तरी काळीज मोहरून जाते. लहान मुलांचे तर हौसेमौजेचे ते दिवस. बैलांच्या गळ्यातील किणकिणणाऱ्या घुंगूरमाळा किती मंजूळ वाटतात. रंगीत गाड्यांनी तर गाडीवाटा खुलून दिसतात. एरव्ही उदासवाण्या वाटणाऱ्या गाडीवाटांना नवंच बाळसं चढलेलं असे.

हे दिवस म्हणजे फुलपंखी सुट्टीचे दिवस. आंब्या फणसांचे दिवस. जांभळा करवंदांचे दिवस. अलाकलेल्या उंबरांचे दिवस. फांद्या–फांद्यांवरच्या माकड उड्यांचे दिवस. त्यातही विशेषत: रंगीत गाड्यांचे मनहारी दिवस. रंगीत गाड्यांचे चित्र

डोळ्यासमोरून हालत नाही. केव्हा एकदा हे वर्षाचं चक्र संपतंय आणि लग्नाचे दिवस येतायत असं वाटून राही. ते दिवस जवळ आले की, आमच्या मनाची कळी खुलत जाई. गुढीपाडव्याची गुढी उभारली की, दारातल्या लगीन मांडवांचे दिवस वेशीत आल्याचा भास होई.

कुणाचं तरी लग्न ठरत चालल्याची कुणकुण आमच्या बाळ कानावर पडे. कधी घराशेजारचं. कधी भावकीतलं, कधी गल्लीतलं लग्न ठरलं जाई. घरातलं मोठ्या भावंडाचं लग्न असलं तर उदंड उत्साह. जवळचं नाहीच म्हटलं, तर गावातलं, वाड्याहुड्यावरचं लग्न असलं तरी आपलंच वाटे. मुलाचं लग्न असलं तर गावातल्या मौजेची चंगळ. भावकीतली-गल्लीतली मुलगी परगावी दिली तर वऱ्हाड जाण्यातला आनंद कोण विचारावा आणि आपल्याच गावचा नवरा उचलून जायचा झाला, तर त्या रंगीत गाड्यांचं लोंबाळ काय विचारावं ! लग्न कुणाचंही असो, कुठंही असो, आम्ही लहान मुलांनी गुडघ्याला बाशिंग बांधलेलंच असे. सतत विचार लग्नाचाच. ध्यानी, मनी, स्वप्नी असायचे. डोळे सतत चाळवले जाणारे. रात्रीच्या झोपेत तर चावळणं हे नित्याचेच आणि मग बहुरूपी डोळ्यापुढं नाचत राहायचा. 'लग्नाला चला हो लग्नाला चला...' हा चाळा लागलेला असायचा. मन इकडंतिकडं चळत राहायचं. सारखे बैलांच्या गळ्यातील खुळखुळणारे चाळ कानात गुंजत राहायचे. ध्यासानं नी भासानं अर्ध जागल्या जांभयाच नुसत्या रात्रभर. लग्नाच्या रंगीत चित्रांनी असंख्य भासांची रंगीत दुनियाच उभे केलेली असायची.

गावातलं लग्न असेल तर फारशी गंमत नसे. वरदावा म्हणून मिरवण्यात थोडी काही मिजास असे तेवढीच. पण रंगीत गाडीतून डुलत जाण्याचे सुखसोहळे नसायचे. वऱ्हाड आणायला कुणीकुणी जायचं याची चर्चा मोठ्या माणसात चाललेली असायची. ती कुतूहलानं ऐकण्यात आम्हा बालगोपाळांना बरं वाटे. अमका अमका का नको वऱ्हाडकरी म्हणून जे ऐकायला मिळे, त्यावरून मोठ्यांच्या भानगडी आणि मखलाशी कळत. कुणी मेंगाणा म्हणून नको, तर कुणी अति हावश्या म्हणून नको, तर कुणी गवश्या म्हणून नको... असं चाललेलं असायचं. कुणी सांभाळून आणणाऱ्या भल्या माणसाची म्हणजे आबानानाची नि जांभळीखालच्या धोंड्याआबाची निवड होई. मग कुणाच्या गाड्या, कुणाची बैलं आणि कुणाचा झुला बघायचा ते अडकित्यानं सुपारी कातरता कातरता ठरे. मग आम्हासारख्या पायसूद पोराला हाटकून सांगितलं जायचं,



'ए बेण्या हिकडं ये. नाक गाळीत काय हुबाल्यासारखं हुबं ऱ्हायलंस. त्या बेटाकडच्या मळ्यात जा, आणिक व्हराड आणायला बैलं पायजेत म्हणावं. काय औतपाणी करायचं आसंल ते बेस्तरवारपावतोर उरकून घ्यायला सांगितलंय म्हणावं.'

मग आमचं ध्यानं काय विचारावं. मनगटानं शेंबूड पुशीत धूम सुटायचं. बरंच म्होरं गेलं की, आठवण व्हायची. तसाच मागं पुढा करायचा की धापलत भीत भीत त्या बैठकीजवळ यायचं. त्यातलंच कुणीतरी डाफरत बोले,

'का रं?'

'पर कुणाला सांगायचं?' चाचरत बोलायचं मग दुसरा दटावत विचारी,

'व्हय रं ये पेंद्या, बेटाखालचा मळा म्हंजी कुणाचा रं?'

'हावसामामीच्या लिंबादाचा.'

'येडझव्या. मग कुणाला सांगायचं रं आँ?'

'लिंबादालाच की...'

'हान असं टाळकं चालीव की जरा. कुठलं येडपटच हाईस वाटतं. कसलं शिक्शान घेतूस रं साळंत.'

हे असं सगळं अकलंच्या कांद्यावर येई नि मग परत लगीनघाई आम्हा पोरांच्याच पाठीमागं लागलेली असायची. कुंभारा-चांभारापासून परटा-न्हाव्यापावतोर आणि गाडी घोड्यांपासून वरदाव्या वरमाईपर्यंतचे निरोप लग्नगाठीसारखे आमच्याच पळापळीला बांधलेले असायचेत.

आमच्या बालपणाचा काळ म्हणजे तीन दिवस चाललेल्या लग्नाचा काळ. वऱ्हाड येई त्या दिवशी हळदी, दुसऱ्या दिवशी लग्नं. तिसऱ्या दिवशी पाणी खेळणं नि पाठवणी. खूप गंमती. खूप रूसवे फुगवे. केळीच्या पानांनी नि नारळाच्या झावळांनी सजलेला लगीन मांडव उराकाळजात अलवार स्वप्नं रचून जाई. धुंद होऊन रंगून जाणं म्हणजे एक विलक्षण मंतरलेपणाच असायचं. नवरीकडचं वऱ्हाड वाजवीत गाजवीत आणायचं. वऱ्हाड वेशीवर आलं की, गाड्या अंधार पडेपर्यंत तिथंच उभ्या करायच्या. चांगलं कडूसं पडलं की, बत्त्या काढून आणायचं. तावलेली हालगी कडकडे आणि लेझमाची दंगल उसळे. दांडपट्ट्याचा खेळ चाले. मांग हालगी आणि घुमकं यांची घाई उडे. वाजंत्र्यांचा ताशा तडतडत राही. धनगरी ढोलावर गजाचा खेळ रंगात घेई. पाव्हण्या-पैंच्या नजरा दीपत. बैलांच्या रेशमी माथोट्यांवरची भिंगन्‌भिंगं लखलखत आणि आम्हा पोरांच्या बावऱ्या नजरा साऱ्या वऱ्हाडावरनं

फिरत. चांदण्यांचं सगळं आभाळच काळजात उतरत असे. एकदा नवरीचं वऱ्हाड जानवसात नि मांडवात शिरलं की, मोठ्या माणसांची नुसती गडबड घाई. आम्हा पोरांच्या वाट्याला नुसतं भिरभिरत्या नजरनं जो खेळ चाललाय तो बघत राहणं एवढंच येई.

पण आपल्या गावचा नवरा दुसऱ्या गावाला उचलून जायचा असेल तर केवढा दिमाख असायचा. साऱ्यांना अपूर्वाई वाटे. झाडून साऱ्या गावच्या गाड्या सांगितल्या जात. तीन-चार दिवस आधी शेताशिवारातली कामं आटोपली जात. दोन दिवस आधी गाड्यांची सजवासजवी होई. दांड्या रंगविल्या जात. चाकांवर रंगीत नक्षी काढली जाई. गाडीवर तट्ट्यांच्या कमानी चढवल्या जात. काहीजण कमानीवर घोंगडी, चादरी बांधीत. बैलांची शिंग रंगविली जात. शिंगाच्या टोकावर पितळंच्या शेंबया बसविल्या जात. माथोटीला भिंगांची रेशमी बाशिंगं, नक्षी नक्षीच्या रेशमांवर जडविलेल्या भिंगाच्या झुला झकपक करीत. रेशमी गोंडे, पायात तोडे आणि गळ्यात सुंदर चाळ आणि नजर लागेल म्हणून शिंगांना बांधलेले लिंबू अशी बैलांची ऐट होई. हरीण कानांची, टपोर डोळ्यांची आणि देखण्या बांध्याची, धष्टपुष्ट खिलार बैलांची जोडी नक्षत्रासारखी सजे. दृष्ट लागेल असा त्यांचा डौल असे.

घराघरांत असा उत्साह दाटून येई, उचलून जाणाऱ्या आयत्या नवरदेवाची शान वाढेल असंच जो तो पाही. गावात गल्लीबोळात उत्साह संचारे. माणसं सजत, बैलं सजत, बैलगाड्या सजत, पाच पन्नास गाड्यांची रांग लागे. गावोगावची माणसं कौतुकानं हा सोहळा पाहात राहात. चांगलं मैल, अर्धामैल लांब माणसांची, गाड्यांची ती आरास डौलाने चाललेली असे. कुण्या गावचा नवरा उचलून चाललाय? असंच बघणाऱ्यांनी नवलाईनं म्हणावं असाच थाटमाट असे. मात्र सगळं कसं आब राखून चाललेलं असल्यानं मनमोकळ्या स्वच्छंदाला तिथं वाव नसे. ज्या गावाला नवरा उचलून जाई तो गावही तेवढ्याच तोलामोलाची सरबराई करी. कोण कुणापेक्षा हिंमतवान हे दाखवण्याची व्याह्याव्याह्यात नि गावागावात जणू स्पर्धाच असे. बैलांसाठी गवतांच्या गंज्याच उपसल्या जात. उचलून गेलेल्या नवऱ्याच्या लग्नाची तऱ्हा मोठी न्यारीच असे. 'हम भी कुछ कम नही' ही रग साऱ्या हालचालीत असे. त्यामुळे आम्हा मुलांना गोंधळल्यागत होई. हा काही लग्नाचा वेगळाच मामला म्हणून बावरून जात असू. अशा लग्नाला आख्खा गाव लोटे. त्यात आमचा कोवळा श्वास कोंडून जाई.



पण खरी गंमत नवरीकडच्या वऱ्हाडातून जाण्यातच असे. कुणातरी शाली, मालीचं लग्न ठरे आणि आम्हाला त्या लग्नाचे डोहाळे लागत. वऱ्हाड न्यायला येणाऱ्या गाड्या गावात आल्या की, कोण कोण वऱ्हाडातून जायचं याचा अंदाज घेतला जाई. आम्ही मुलं तर शालीमालीच्या दारा अंगणात रेंगाळत असू, तिथंच घुटमळायचं. कानोसा घ्यायचा. पुढं पुढं दिसेल असं उभं राहायचं. आपल्याला वऱ्हाडातून नेण्याचं निश्चित होईपर्यंत जीवाची घालमेल वाढे. घरात रूसायचं, रडायचं, आदळआपट करायची. आईला गळ घालायची. एकदाचं 'जा तिकडं मर जा' म्हणून आईनं वैतागून म्हटलं की, आमचा आनंद गल्ली बोळात मावत नसायचा मग 'नकटीच्या लग्नाला सतराशे साठ विघ्नं' आली तरी त्याची खबरबात आमच्या कानावर नसायची. आम्ही हवेत तरंगायचो. पायाला थारा नसायचा. रात्री डोळे टक्क उघडेच असायचे. आपणच कपडे धुवायचे. लख्ख करायचे. कधी नाही ते तळ्यात, नाही तर नदीत डुंबून आंघोळ करायची. हातपाय घासून वर्षाचा साठलेला खंडीभर मळ काढून टाकायचा. उजळ व्हायचं. मग मनतन खमंग होऊन जाई.

वऱ्हाड न्यायला आलेल्या पाव्हण्यांच्या गाड्या परड्यातल्या खळ्यावर सुटलेल्या असायच्या. त्या बैलांच्या गळ्यातले चाळ वाजायचे. मन कसं नादावून जाई. तिथंच गाड्यांच्या अवतीभवती रेंगाळायचं. बैलांच्या अवतीभवतीच लहरत राहायचं. कुणी कुणी लग्नाला येणाराय त्यांच्याशी गट्टी जमवायची. लग्नाला लावून न देणारी मुलं हिरमुसून दूर उभी असायची. मग आम्ही उगाच त्यांच्याभोवती मिरवायचो. त्यांना हेटवायचो. तरीही गाड्या निघेपर्यंत आमच्याही मनाला धीर नसायचा. जाऊच याची खात्री नाही वाटायची. आपल्याला पाठवतीलच याचा भरवसा नसायचा. एक अशी हूरहूर काळजात ठसठसत राहायची.

सगळी आवराआवर होई. मग हाकारा उठे. एखादा वयस्क तात्याबा घरादारासमोर उभे राहून वडिलकीच्या धाकानं म्हणे,

'बायाक्का, अजून तुझं गाडग्यातलं मडक्यात नि मडक्यातलं गाडग्यात करायचं चालू हायीच का? उठ की मर्दिनी. आटप. गाड्या टायमावर जायला पायजेत न्हवं?'

'ए म्हादबा, का रं, आजून उन्हाला पाठ लावूनच बसलायस का? जलम गेला मर्दा तुझा. येळ वकुत हाय का न्हाई-बारा म्हैनं तेच. उठतूस का कसं?'

'ए ए पोरट्या, दात कसलं काढतूयास. त्या हारणीच्या तुक्याला बलावून

आण जा. आटपा म्हणावं. गाड्या चालल्यात. न्हाईतर फेसलत तांगड्या तोडीत याला लागंल.'

एकादाच्या दारातून गाड्या हालतात आणि ज्या पोरांना घेतलेलं नसतं त्या पोरांनी रडण्याचं तांडव माजवलेलं असतं. ओरडून ओरडून भुईवर लोळत दंगादंगा चालवलेला असतो. त्या पोरांचं रडणं, लोळणं बघून गाडीतल्या एखाद्या आईमायचं हुर्दं भडभडून येतात. पण शालीमालीच्या लग्नाच्या वऱ्हाडाच्या गाड्या गल्लीतून दिसेनाशा होतात. गाव ओलांडतात. वेस मागं पडते आणि आपला शाली-मालीचा गाव दूर राहात जातो. मुराळ्यांना लग्नघराची ओढ लागत राहाते. चाकांना गती येते. बैलांच्या गळ्यातले चाळ तालावर येतात. गाडीवाटंचा धुरळा उडत राहतो. आपलीच रोजीचीच माणसं आता वऱ्हाड झालेली असतात.

वऱ्हाडाच्या गाड्यांनी सूर धरलेला असतो. वऱ्हाडाच्या तीन गाड्या असतात. एका गाडीत नवरी आणि कलुऱ्या वाटीदाटीनं बसलेल्या असतात. तिथंच मुंडावळ्याचं सामान नि नवरीची आई बसलेली असे. लग्नाचं सामान, दुपारची वऱ्हाडाची झुणकाभाकर तिथंच असते. तिसऱ्या गाडीत पोराटोरांचा सारा चिगुरा खच्चून भरलेला असे. चौथी गाडी ही घरची असते. तिच्यात लग्नातल्या न्याहारीचे सामान नि बडामाच्या दुरड्या ठेवलेल्या असतात. कमानीला रुखवताच्या दुरड्या हेलावत असतात. नवरीच्या मनात त्या अनाम गावाची, तिथल्या माणसांबद्दलची हूरहूर दाटून आलेली असते. नवरीच्या आईबापाच्या काळजाला लग्नाची चिंता डसलेली असे. म्हातारी माणसं मागल्या कुणाकुणाच्या लग्नाच्या आठवणी सांगण्यात रमलेली असतात. गाड्यांमागून चालत येणारी तरणीताठी माणसं असंच काहीबाही काढून ओढीनं चाललेली असतात.

आम्हा पोरांना हेही नसतं आणि तेही नसतं. गमत्या करीत जायचं एवढंच माहिती असतं. आम्ही गाडीवान मुराळ्याशी सलगी करतो. त्याला हुलीवर घालतो. आपली गाडी सगळ्या गाड्यांच्या पुढं काढायला सांगतो. तोही मग आपली गाडी पुढं काढायला बैलांची शेपटी मुरगाळतो. गाडी पुढं निघत जाते. पुढच्या गाडीवानांना मग चेव येतो. गाडीवानांची ईर्षा खिलारी बैलांत शिरते. गाड्या उधळतात. चाकांची भिंगरी होते. माणसांचा पाळणा होतो. गाडीरस्त्याचा धुरळा आकाशभेरी उठतो. बैलांच्या चाळांचा आवाज तेवढा खळखळत असतो. आम्हा पोरांच्या मनाचीही भिंगरी होते आणि बैलांच्या अंगावरील झुलांची भिंगं उन्हाच्या किरणांनी झगझगत राहतात.



नवं वारं. नवी माती. नवं गाव. नवी माणसं. कधी नदीकाठ. कधी डोंगरमाळ. कधी उंच उंच डोंगर. कधी खोल खोल दरी. कधी दमछाक उडवणारा उभा घाट. कधी घरंगळत नेणारी जीवघेणी उतरण. अवतीभवतीचे आभाळाला माथा दिलेले डोंगर. अवतीभवतीचा सपाट पसरलेला विराट पसारा. नजर न पोचेल असा मुलूख. या नव्या जगाच्या दर्शनानं चिमुरडी काळजं चकित होऊन जात. अंगात वारं शिरे. किती किती डोळ्यात साठवावं कळत नसे.

गाडी घुंगराची चाललेलीच असते. आमच्या देहामनाचं घुंगरू झालेलं असतं. उन्हं केव्हा चढली; सूर्य माथ्यावर केव्हा आला माहिती नसते. निरनिराळ्या गावांच्या वाटा फुटत. इकडून येत. तिकडे जात. हे तर लग्नाचे भरगच्च दिवस. वाटावाटांनी वऱ्हाडाच्या गाड्या येत. या गावाला जात. त्या गावाला जात. गाडीवाटा असल्या रंगीत गाड्यांनी फुलून गेलेल्या असत. कुठे फोनोवरची गाणी ऐकायला येत. कुठे वाजंत्र्यांनी वाजवलेल्या ढोलताशांचा आवाज येई. कधी वाजंत्रीवालेच कुठं तरी लग्न वाजवायला निघालेले दिसत. कुठे जुन्या माघारणी चाललेल्या दिसत. सगळ्यांच्या चेहऱ्यावर लग्नाचीच उत्सुक ओढ दाटलेली असायची.

ही अशी झुलती दुनिया असली तरी तहान ती तहान. भूक ती भूक. हळूहळू पोरं कुरकुरत. सगळ्यांनाच भुका लागलेल्या असत. कुठं तरी नदीकाठच्या गाडी तळावर गाड्या थांबत. हा गाडीतळ मोठमोठ्या वडाच्या झाडांच्या गर्द सावलीत असे. कधी आंब्याचं बन असे कधी थोराड चिंचाच्या झाडांचा गारवा असे. लागूनच नदीकाठ आणि काळ्याशार पाण्याचा खोल डोह असे. भरदुपार इथल्या गार सावलीत विसावे. इथं तर साऱ्या गाड्याच गाड्या सुटलेल्या असत. झाडावर पाखरांचा चिवचिवाट आणि खाली भिरभिऱ्या पोरांचा कलकलाट. वातावरण कसं मन लुभावणारं असे.

दिवसाची वाट. दुपारची आधीच तयारी केलेली असे. डाळ कांदा नि झुणकाभाकरीचं तिरडं सोडलं जाई. झुणकाभाकर हातावर घेऊनच त्या गार वाऱ्यात तशीच कोलमडणं हे बीनलाजेचंच असे. मोकळा वारा. मोकळी माणसं आणि असं मोकळं मोकळं झुणकाभाकरी खाणं. किती रूचकर वाटे. बैलांनाही चारा पाणी होई. अंग सैल होते. सूर्य कले. दिवस परते. विसाव्याचा आळस झडे. नव्या दमानं गाड्या वाटा धरीत. खळखळ... खळखळ आणि खळखळ...

वाटेत एखादी विहीर लागे. तिच्या काठी अलकून पिकलेला उंबर असे.

अलाकलेली उंबरं पाहून तोंडाला पाणी सुटे. आम्हा पोरांचा घोळका गाडीतून उड्या मारी. अलाकलेली उंबरं पाडी. ‘तेल्या तेल्या तेल दे / वाण्या वाण्या गूळ दे’ म्हणीत उंबरं चिलबिलली जात. गाड्या लांब गेल्याचं पाहून अपुऱ्या इच्छेने पळावे लागे.

हे तर आंब्याजांभळाचे दिवस. आम्हा पोरांच्या बेरकी नजरा सतत झाडं हेरण्यात दंग असायच्या. आंब्याची, जांभळाची झाडं गाडीवाटेच्या कडेने असायची. कधी आडरानातल्या आडबाजूला दिसायची. मग आम्ही गाड्यातून पटाटा उड्या मारीत असू. आमची वानरसेना झाडांवरच्या वानरांना दबवीत झाडांवर दगडांचे टिपीरे मारीत असे. वानरं गदारोळ उठवायची आणि पिकलेली जांभळं खाली झडायची. जांभळीची झाडं तर जांभळांचे घोसच्या घोस अंगभर लगडून उभी असायची. टिपीरा दिला की टपोऱ्या जांभळांचा नुसता सडा पडे. मग जांभळं खाता तोंड जांभळं. ओठ जांभळं आणि पोटही जांभळंच होई. आंब्याच्या झाडावर आमच्यातील एखादं टारगट चढे आणि शेंडीचं गलंद अलाकलेलं आंबा काढी. खाली पडलेल्या आंब्यासाठी आमच्यासारख्या ऐतोबांच्या झट्याझोंब्या चालत.

गाडीवाट डोंगराच्या कपारीनं जंगलरानात घुसली की, सगळ्या करवंदांच्या जाळ्या लागत. पिकलेली काळीकरंद करवंदं खाता खाता बोटं, तोंड चिकट होऊन जाई. करवंदं धुंडत धुंडत जाळ्याजाळ्यातून आत शिरत जात असू. करवंदानं नादावून बरंच आत जाळवंडात गेलं की, पुढं खोल दरी दिसे आणि भीतीने कापरं भरे. मग गाड्यांची आठवण होई, दरदरा घाम सुटे. तसंच जोरानं पळता पळता थरकापरं भरे. झाडून, काढून आणलेले आंबे, जांभळं आणि ओरबडून आणलेली तोरणं, करवंदं गाडीतल्या काकी मावशींना देताना कोण आनंद होई. आमच्या या असल्या उनाड खोडकीलपणाला शिव्या देत त्याही ती फळं आनंदानं खात.

हे उनाडपण गोड छंद करताना कधी अंगाशी येतं, कुणी झाडावरून पडे. अंग ओरबडे. पाय ठेचाळत. बोटं चिंधलत. काटे चुंबत. पाय खरचटे. करवंदी काटे तर रक्त काढीत. नव्या कोऱ्या सदऱ्याचा फारोळा निघे. पण यातही मनमुक्त मौज वाटे.

कित्येकदा जीवघेणा प्रसंग ओढवे. रणरणत्या उन्हात एकाएकी वारा पडे. भयंकर वादळ उठे. ते गिरगिरत आभाळापर्यंत भिडे. अवघा मुलूख वादळवाऱ्यानं घुसळून निघे. गाड्यांच्या कमानी मोडून पडत. बैलं बिथरत-वळवाचे ढग आभाळभर जमत. आभाळ लोंबू लागे. बघता बघता अंधारून येई. काळ्याकुट्ट ढगांचं उग्र रूप



पाहून भीतीचा काटा अंगावर उमटे. आभाळ गडगडे. ढग कडाडत. विजांचे चपकारे बसत. कानठळ्या बसवणारा गडगडाट होई. बघता बघता गारांचा मारा सुरू होई. मुसळधार पाऊस कोसळे. बैलांना गारांचा मारा होई. गाडीवानांना गाड्या आवरता आवरत नसायच्या. बैलं उधळत. गाड्या धडाडत. माणसं आदळत. फेकली जात. पावसाच्या माऱ्याने कमानी कोलमडून पडत. दाणादाण होई. दैना उडे. कापडांचा भिजून चिंब होऊन कालाकित्ता होई. पोराबाळांचा घाबरून आकांत होई. कुणालाच काय करावं सूचत नसे. भयंकर वादळी पाऊस. गारांचा मारा. विजांचा कडकडाट. नुसतं राक्षसी थैमान चाललेलं असे. ओढ्या नाल्यात पाणी मावत नसे. एखादी गाडी प्रचंड पाण्यातून वाहातीला लागे. एखादी उलटे. आरडाओरडा, रडारड, सारंच भयानक... तरीही हळदी... लग्न... पाठवणी होईच.

असाच रंगाचा बेरंग काही नेहमीचा नसे. रंगीत गाड्यातला प्रवास सुखद असे. लग्नातली मौज ब्रह्मानंदापेक्षाही वेगळी असे. त्यातली खुमारी काही न्यारीच असे.

तीन दिवस कसे जात ते कळत नसे. वेळेवर जेवण मिळे. न मिळे, फाटकी पत्रावळी, तुटके द्रोण, कधी आंबलेला भात खावा लागे. जानवस घर ते कसलं. ढेकणापिसवांचं माहेरघर. जानवसात मुंगीलासुद्धा पाय ठेवायला जागा नसे. दाटीवाटीनं लवंडायचं. ना आंघोळ, ना पाणी-अनोळखी गाव पण हे सारं सारं वाजंत्र्याच्या नादात विसरलं जाई. गावाशिवाची आठवणही होत नसे. केळवण, न्याहारी, रुखवत, बडाम यातल्या खमंग गमतीनं नि रूसव्या फुगव्यांनी ते दिवस कसे जादूचे वाटत. कानपिचकी झाली की वरात निघे. भर हौसेचे दोन दिवस संपत. परातीतल्या रंगीत पाण्यात मासं धरण्याचा खेळ रंगे. नावं घेऊन होत. नवरानवरीच्या कपाळीची बाशींगं उतरत. हळूहळू पाव्हनापैंनी आपापल्या गावची वाट धरलेली असे. मांडवातली वर्दळ विरळ होई. वाजंत्र्यांच्या सनई ताशात जोश उरत नसे. भरल्या मांडवाची केरळी नारळीची आरास मलूल होऊन जाई. आख्खा मांडव मांडवझळांनी उदास भासे आणि मग वऱ्हाडालाही परतण्याची घाई होई.

आधीच माणसांची पांगापांग झालेली असते. भरलेलं जानवस घर रिकामं होऊ लागतं. लग्नघरचा पाहुणा एखादं दुसऱ्या गाडीची लगडातगड करी. बिनतड्ड्याचीच गाडी मांडवासमोर उभी राहाते. त्यात उरलंसुरलं लग्नसामान कोंबलं जाई. त्या अडचणीतच म्हाताऱ्या बाया बसत. बाकी सारा चिंगुरा गाडीच्या

पाठीमागणं चालत जाण्याविना गत्यंतर नसतं. रात्रीची येळवण्याची शाख आणि रात्रीचाच आंबून गेलेला भात कसातरी पोटात ढकललेला असतो. तेवढ्यावरच आख्ख्या दिवसाची वाट चालायची असते.

नवरीच्या जीवात कालवाकालव चाललेली असते. पाठराखीण तिच्या लगेनं उभी असते. लेकीला सोडून जाताना आईबापाचा जीव कासावीस होतो. माय लेकीला पोटाशी धरून दबलेल्या हुंदक्याला वाट करून देते. 'सांभाळा लेकीला. माझी पोर म्हणजे अल्लाची गाय आहे. तुमच्या हवाली केलीय.' असं म्हणून बापही पटक्याचा शेव आसवांनी भरलेल्या डोळ्याला लावतो.

बीन नवरीची गाडी चालू लागते. हातांचे पालव होतात. उरलंसुरलं वऱ्हाड आपल्या लेकीला सोडून चालू लागतं. लग्न मांडवातल्या हिरव्या चुड्याच्या हाताच्या पालवाकडं पाहात उदास बनत काहीतरी हरवून चालल्यासारखं चाललेलं असतं.

गाडी चाललेली असते... अगदी गप्प गप्प
बैलांना झुला नसतात. गाडीला तट्ट्या नसतो.
परतणाऱ्या गाडीत गावची लेक नसते.
ती दूर दूर राहिलेली असते.
आता परतेल तेव्हा ती माहेरचीच पाहुणी असेल.
गाडीवाट उदास दिसत असते.
तिचे डोळे पाणवतात.
आम्हा छोट्यांचे डोळे मागे मागे वळत असतात.
गाडी घुंगरांची हरवलेली असते.

✦ ✦ ✦



# परी

यावेळी दीपानं बरेच दिवस अंथरूण धरलं होतं. पार कोमेजून गेली होती. चेहरा सुंदर पण तो फटफटीत झाला होता. काळेभोर, बोलके डोळे निस्तेज बनले होते. तिच्या चेहऱ्यावर पडलेल्या सुरकुत्या पाहून मी घाबरून गेलो. रोज भल्या पहाटे उठणारी दीपा आज दहा वाजले तरी तिची चाहूल नव्हती. मला काळजी घेरून बसली. मी तिच्या खोलीत गेलो तर काहीच हालचाल नव्हती. मला काळजी पडली होती. अशी ती कधीच गपचिप पडत नसे. सगळ्या आधी उठे आणि 'दादा' म्हणून मला हाका मारीत राही. अंथरूणातल्या अंथरूणात धडपडत राही. तिची आई अनिता जागीच असे, तिचं म्हणजे दीपाचं अवेळी जागं होणं तिला आवडत नसे. आधीच कामाधामानं ती दमून गेलेली असे. उशिरा केव्हा तरी धरणीला ती अंग टाके. त्यामुळे दीपानं कितीही हाका मारल्या तरी ती पांघरूण घेऊन तशीच पडून राही. मग मीच कंटाळून अनिताला हाक मारी. ''अनिता, बाळ जागं झालेय. हाका मारतेय कळत नाही का? दीपाला बाहेर आणून सोड?''

मीही दीपाचा थोडा जरी आवाज झाला तरी अंथरूणावरून उठे.

अनिता दीपाला तिच्या अंथरूणासह आणून बाहेर सोडी. मी तिला समजावे

टी. व्ही. लावून देई. दीपा व्हीलचेअरवर बसून बघत राही. मग सावकाश घरातली सारी उठत. पण गेल्या आठवडाभर दीपाचा नेम बदलला होता. अंगात ताप होता. खोकल्यानं बेजार करून टाकलेलं. जिभेवरून गराळ ओघळलेली असे. नाकातून पाण्याच्या धारा. उष्ण श्वासोच्छ्वास. धपापणारी छाती. कसं तरी दूध आणि पाणी घोटे. आम्ही सारेच तिच्या घोरात होतो.

गेली तेरा वर्षे आम्ही घरदार हे सत्य अनुभवतो आहोत. ती आमच्या धाकट्या मुलाची पहिलंच मूल. चांगली बीएस्सी झालेली, करिअर घडवायचं स्वप्नं बाळगणारी आमची धाकटी सून अनिता. तिचीच ही मुलगी. ती जन्मली आणि तिचं स्वप्नं मोडून पडलं. बाळंतपणाचा अंदाज नसलेल्या अनिताला अवेळीच प्रसूती वेदना झाल्या आणि त्यातच हे मूल आतल्या आत गुदमरलं. जन्मल्यावर दीड महिना काचेच्या पेटीत ठेवलं. नंतर डॉक्टरांनी सांगितलं,

'बाळाच्या लहान मेंदूला धक्का पोहचलाय. त्याची सर्व कामं बंद आहेत.'

आम्हाला धक्का बसला. आमच्या घराण्यात असं अशुभ कधीच घडलं नव्हतं. आशा काळजात धरून डॉक्टरांना विचारलं,

'डॉक्टर यावर इलाज.'

'शरीरात बिघाड असता तर काहीही करता आलं असतं. जगात लहान मेंदूवर इलाज नाही.'

आशाच संपली. सारं घर अंधार वेढून बसलं. शिकली सवरलेली अशी या लेकराची आई कोसळून पडली.

तरीही घरानं या मुलासाठी नानाप्रकारचे इलाज करून पाहिले. अंगारेधुपारे झाले. देवदेवर्षी झाले. कुणी जे जे सांगेल ते ते केलं. पायपीट झाली. चौमुलूख उपचारासाठी धुंडला. आशेने कुठं कुठं धावलो. अखेर ते मृगजळच ठरत गेलं.

कुठला साताजन्मीचा भोग म्हणून परिस्थितीशी झुंजत राहिलो. पण देवानं पोर नक्षत्रासारखी दिली होती. सुंदर, देखणी. फुलाच्या स्पर्शांनही कोमेजून जाईल अशी. गोरीगोमटी काया. नाजूक. नजर लागेल अशी पोर. एखादी प्रशांत आणि प्रसन्न देवी असावी अशी तिची भावमुद्रा होती. एक परीनं मुग्धा वाटावी अशी निर्मळ, निष्पाप, निरागस पोर. नाक तरी किती छान ! इवलेसे. हसली की बाळ रूप बघून जो तो तिच्या निरागस गोडव्यात हरवून जाई. तोंडातून अभावितपणे शब्द फुटे.

''सुंदर, अद्‌भुत.''



पण नियतीनं तिला लुळंपांगळं करून टाकलं होतं. तिला फक्त हालता येत होतं. काळ्याभोर नाजूक नजरेनं लुकू लुकू पाहता येत होतं. घराला आशा होती. आज लहान आहे. म्हणून हे असं लोळागोळा असल्यासारखं. पर दिसामासानं पोर मोठी होईल तशी हसेल, खिदळेल, सरकेल, रांगेल, दुडुदुडु पळेल. सारं कसं ठीक होईल. पण मानच धरता येत नाही तिथं असं कसं घडेल अशी शंकाही काळजाला चाटून जाई.

पण नंतर कळलं, ही वेडी आशा आहे.

तसं काही घडलंच नाही.

मग घर दुभंगून गेलं.

अंथरूणावर पडून राहणारा तो लिबलिबीत गोळा आहे.

दीपाला बसता येत नव्हतं. बसवलं, उभं धरलं की, तिची मान पडे. दुधाशिवाय काही खाता येत नव्हतं. दूध पाजायला लागलं की, ते घोटत नसे. सतत छाती भरलेली असे. तोंडातून बडके पडत. एवढं पातळ दूध, तेसुद्धा पाजता पाजता तास तास लागे. तिची आई अनिता दमून जाई.

पाच सहा वर्षे गेली. जसं दीपाला कळू लागलं तसं ती हातपाय आपटे, रडत राही. पण त्यातही बरं एवढंच की, तिची मान धरू लागली. बाकी सारं जसंच्या तसंच. होणारे विधीही तिला कळत नसत.

एक एक वर्षं पालटू लागली तसं तिला या जगाची ओळख तिच्या नजरेत उमटू लागली. चालणं नाही, बोलणं नाही, बसणं नाही, उठणं नाही. एवढासा चिमुकला भाताचा कण तोंडात गेला तरी ठसका लागे. पातळ पाणीही घोटता येत नव्हतं. पाय वाकडे, हात ताठर, बोटं घट्ट. लहान मेंदूची सगळी कामं ठप्प होती.

मात्र समज येऊ लागली आणि तिला कळू लागलं,

''आपल्या अवतीभोवतीची माणसं बसतात, चालतात, पळतात सगळं काही यांना येते. मग आपल्यालाच का नाही येत? का?''

मग रडत राही. चिडत राही. पाय आपटत राही? लहान मुलं, ही तर आपल्याचसारखी असं तिला वाटे. मग तिचं डोकं भणभणत राही.

''या मुलांना रांगाता येतं. पळता येतं. दूध झटकन पिता येतं. हवा तसा खाऊ खाता येतो. हवं ते मागता येतं. मग मला का नाही येत त्यांच्यासारखं? हो का नाही

येत?'' असा विचार तिच्या डोक्यात धुमसत राही. मग ती मानेनेच, रडवे ओठ करून आम्हाला विचारत राही.

''असं मला का नाही येत?''

आमच्या डोळ्यात पाणी उभं राही. आम्ही गप्प झालो की ती रडत राही. उत्तर मागत राही. तिची भाषा ही अबोलच. मानेने सांगे. चेहऱ्यावरच्या हावभावांनी प्रश्न करी. नजरेतल्या खाणाखुणांनी कोड्यात टाकी. ती या हावभावाच्या भाषेत प्रश्न करी. तिची ती भाषा आम्हाला कळत नसे. तिचं सांगणं समजत नसे. मग तिच्या रडण्याचा आकांत घराचं काळीज फेडून टाकी. आजी डोळ्याला पदर लावून म्हणे,

''परमेश्वरा, कसलं जगणं बांधलंय पोरीच्या नशिबी ! काय करावं तिनं? काय या एवढ्याशा बाळाचा अपराध? जन्माला तरी घालायचं कशाला देवानं या लेकराला?'' असं आजी बोलल्यावर तिला शंका येई. आपल्याला असं बनवणारं कोण तरी आहे, असं तिला वाटे. मग मानेने विचारी,

''परमेश्वर म्हणजे कोण?''

उत्तरासाठी हूंऽ हूंऽऽ करीत राही. मग आजी देवांचे फोटो दाखवी. ती ते नजर खिळवून पाहत राही. आजी देवाला काय म्हणते, पाया कशी पडते ती पाहात बसे. मग ती मला म्हणे, चेहऱ्यावरच्या हावभावनेच सांगे,

''तुम्ही माझ्यासाठी देवाला सांगा?''

''काय?'' मी विचारी.

तोंडातून जीभ काढून मला खाता येऊ दे असं सुचवी. हातापायाकडे पाहून म्हणे, मला चालता येऊ दे. काम करता येऊ दे. म्हणून देवाची प्रार्थना करायला सांगे. मी सद्गदीत होई. मनाचा कोंडमारा होई.

वाटे.

''कसं सांगावं या लेकराला? कसं समजंवावं? देव इतका शहाणा नाही हे कसं पटवावं?''

मी विचारात गढून उत्तर नाही दिलं की दीपाचा दंगा सुरू होई. आरडे ओरडे.

दीपा माझ्या खोलीत धरणीवर पडून असे. तिचं लक्ष कशात तरी गुंतवावं म्हणून टी. व्ही. चालू ठेवी. उठल्यापासून झोपेपर्यंत टी. व्ही. वरची चित्रं पाहात राही. तेवढाच त्या बाळ जीवाला विसावा. तोच तेवढा विरंगुळा. तिला मध्येच



आठवण होई. मला देवाला प्रार्थना करायला सांगे. तिच्या समजुतीसाठी मी साधना करण्यासाठी बसतात तसं आसन घालून बसे. तोंडानं म्हणे, ''ॐऽऽ हरी हरीऽऽ.... परमेश्वरा, जगदीशा, आमच्या दीपाला बरं वाटू दे. तिला बोलायला येऊ दे. चालायला, बसायला येऊ दे. तिला इतरांच्या प्रमाणे खातापिता येऊ दे. हसू, खेळू दे. परमेश्वरा दीपाला बरे कर. ॐ नमः शिवायऽऽ ॐ गणेशाय नमः''

मी असं म्हटलं की, दीपाला बरं वाटे. तिच्या चेहऱ्यावर हसू फुलून येई. तिच्या नजरेत 'आता आपण बरं होऊ, असा भाव एकवटे. त्याच आनंदात मागे पुढे झुलत राही.'

तिला कोपऱ्यात व्यवस्थित बसवलं जाई. आता तिचा कणाटा थोडासा कठीण बनत चालला होता. मग तिला बसण्यासाठी टब तयार केला. व्हीलचेअर बनवली. आता तिला थोडा बसण्यातला आराम मिळे. तीही आपलं डोकं गुडघ्यावर टेकवून पाया पडे. नुसताच आँऽऽ आँऽऽ करून देवाची प्रार्थना करीत राही. गौरी गणपतीला तिला नटवलं जाई, सजवलं जाई. मुली झिम्मा खेळत. तसा झिम्मा आपल्यालाही येऊ दे म्हणून ती देवाची तिच्या आवाजी भाषेत प्रार्थना करी.

पण वर्ष सरलं. प्रार्थना करून आम्ही थकलो, दीपाही दमून गेली. मग तिला वाटलं 'हे सारं खोटं आहे. देव खोटा आहे. तो आपल्याला बरं करीत नाही.' ती निराश झाली. देवाचा तिरस्कार करू लागली. देवाचा फोटो दिसला की वैतागानं ओरडे. तो फोटो तोडून फोडून टाका असे सुचवी.

''तोंड नको त्या देवाचं माझ्यासमोर.'' दातओठ खात ओरडे.

तिचा तो खेळ भयंकर असे. तिरस्कार भयंकर असे. ती खिन्न होत चालली, नाराज होत निघाली. तेवढ्यात टी. व्ही. पाहाता पाहाता तिला कळू लागलं. माणूस मरतं. बाळ जन्माला येतं. त्याचं कोडकौतुक केलं जातं. ते बाळ हसतं, खेळतं. शाळेलाही जाऊ लागतं. शेजारीपाजारची मुलं खेळताना, नाचताना, शाळेला जाताना ती पाहात होती. तिला काही तरी समज आली. तिच्या मनात विचारांचं थैमान चालू झालं आणि एक दिवस तिच्या तोंडातून उद्गार निघाला. ''आई''

आम्हाला आनंद झाला. आता दीपा बोलेल अशी आशा बळावली. पण तिला फक्त तीनच शब्द उच्चारता येऊ लागले. आपल्या आईला आक्का म्हणायला लागली. आजीला आई म्हणून संबोधू लागली. मला ''दादा'' म्हणून हुंकारू लागली. या तिन्ही शब्दाशिवाय आजपर्यंत काहीच उच्चारता येत नव्हतं.